
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आज़ादी का अमृत महोत्सव



रणक्रांति मल्टीडिसेंप्लेनरी रिसर्च जरनल RNI MAHMAR. 43768/18/12/2013.TC

ISSN-2454-8731

Peer Reviewed Journal, Impact Factor 5.057

## भाई डॉ. केशवराव धोंडगे यांच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त ग्रंथाचे प्रकाशन

# वसा विचारांचा - फुले-शाहू-आंबेडकरांचा

कॅप्टन डॉ. दिलीप सावंत

संपादक

डॉ. उमेश पुजारी

सहसंपादक

Scanned with CamScanner

# अनुक्रमनिका


| अ.क. | संशोधन विषय | लेखकाचे नाव | पान. क. |
|---|---|---|---|
| 1 | मराठी काव्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक तत्वज्ञान | साईप्रसाद मधुकर पंडीत | 01 to 05 |
| 2 | फुले–शाहू–आंबेडकर यांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव | 06 to 09 |
| 3 | राजेंद्रकुमार लक्ष्मणरावडॉ. बाबसाहेब आंबेडकरांची सामाजिक न्यायाची संकल्पना | प्रा. डॉ. राहुल ज्ञानेश्वर कापुरे | 10 to 12 |
| 4 | छत्रपती राजश्री शाहू महाराज आणि स्त्रीमुक्ती कायदे | प्रा. डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव | 13 to 17 |
| 5 | मानवतावादी क्रांतिकारक – महात्मा जोतीराव फुले | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 18 to 22 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रीविषयक भूमिका | डॉ. रवींद्र बेम्बरे | 23 to 28 |
| 7 | महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक विचार | प्रा.डॉ.वनमाला लोंढे | 29 to 34 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास | डॉ. मयुरी राजेश्वर फुके | 35 to 38 |
| 9 | Towards Harmony: "A Study of Communal Deadlock And A Way To Solve It" by Dr. B R Ambedkar | Preetha Prabhasan | 38 to 43 |
| 10 | महात्मा जोतिराव फुले यांची बहुजन संस्कृती विषयक विचार | डॉ. संजय बालाघाटे, | 44 to 48 |
| 11 | राजर्षी शाहू महाराजांचे लोकाभिमुख प्रशासन | डॉ. गायकवाड चंपत दाउ | 49 to 51 |
| 12 | म. फुलेची स्त्री शिक्षण विषयक भूमिका | डॉ. दिपक पवार | 52 to 53 |
| 13 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार | प्रा.डॉ.पी.डब्ल्यू.पाटील | 54 to 58 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य | डॉ. प्रताप गायकवाड, | 59 to 66 |
| 15 | म.फुले–राजर्षीशाहू–डॉ.आंबेडकर आणि मराठी साहित्य | लिंगप्पा गुळाळे, | 67 to 74 |
| 16 | महात्मा फुले यांचे कृषीविषयक विचार | डॉ. शंकर लेखने | 75 to 80 |
| 17 | आंबेडकरवादी साहित्याचे उर्जास्त्रोत :– फुले–शाहू–आंबेडकर | धनंजय पांडुरंग सोनकांबळे | 81 to 83 |
| 18 | राजर्षी शाहूमहाराज : एक परिचय | प्रा. ज्ञानेश्वर भोसले | 84 to 91 |
| 19 | नवीन शैक्षणिक धोरणावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव | डॉ. देवेंद्र रमेशराव भगत, | 92 to 96 |
| 20 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्रि मुक्ती विचार | डॉ. भारत शिंदे | 97 to 99 |
| 21 | महात्मा ज्योतिबा फुले – विचार आणि कार्य | डॉ सुधीर ब.गायकवाड | 100 to 104 |
| 22 | छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक विचार – एक चिकित्सक अभ्यास | प्रा. सोनकांबळे बी. जी. | 105 to 109 |
| 23 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य | शितल संग्राम सालवाडगी | 110 to 115 |
| 24 | दलित कवितेतील विद्रोह : काल आणि आज.. | डॉ. लक्ष्मण पवार | 116 to 122 |
| 25 | डॉ. भीमराव आंबेडकर और सामाजिकता | प्रा. डॉ. यु. ए. सय्यद | 123 to 127 |
| 26 | म. फुले यांचे शेती विषयकविचार कार्य व वर्तमान स्थितीतील प्रासंगिकता. | प्रा. अमोल सुदामराव श्रीखंडे | 128 to 131 |
| 27 | राजर्षी शाहू महाराजांचे क्रीडा विषयक धोरण | प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, | 132 to 134 |


Scanned with CamScanner

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व श्री शिवाजी कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अॅड सायन्स, ता. कंधार जि. नांदेड आयोजित
राष्ट्रीय चर्चासत्र २७ डिसेंबर २०२१
ISSN: 2454-8731

# महात्मा फुले यांचे कृषीविषयक विचार

डॉ. शंकर लेखने

लोकप्रशासन विभागप्रमुख,

कला, वाणिज्य व विज्ञान महा., शंकरनगर

## प्रस्तावना :

भारतीय समाजजीवनाला परिवर्तनाची दिशा दाखवणारे आणि समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी आजीवन प्रयत्नशील असणारे कर्ते समाजसुधारक म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांचे योगदान महत्त्वपूर्ण असे आहे. जीवनातील अज्ञानरूपी अंध:कारामुळे वेगवेगळ्या प्रश्नांचा जो काळोख विसाव्या शतकामध्ये निर्माण झाला होता, तो दूर करण्यासाठी शिक्षणाचा ज्ञानमार्ग प्रशस्त करण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केलेले आहे. जातिव्यवस्थेने निर्माण केलेली विषमता, सवर्ण वर्गाचे समाजव्यवस्थेवर असलेले प्राबल्य आणि त्यातून बळावत गेलेली गुलामगिरी, शोषण यांची त्यांनी चिकित्सा करत या व्यवस्थेला हादरे देऊन समाजपरिवर्तन केले.

अठराव्या शतकात ब्रिटिश काळात समाजामध्ये जेव्हा अज्ञान, बेकारी, निरक्षरता, अंधश्रद्धा आणि दारिद्र्याने कमालीचा उच्चांक गाठला होता, शेतकरी, कष्टकरी वर्ग सावकारांच्या कर्जाखाली दबलेला होता, दुष्काळ, रोगराई आणि विषमतेने गोरगरीब शूद्रातिशूद्रांना विळखा घातला होता; त्यावेळी निद्रिस्त समाजाला जागे करून त्यांना विद्येचे महत्त्व पटवून देणारे त्यागी, कृतीवंत व्यक्ती आणि एक समाजसुधारक नेता महात्मा ज्योतिराव फुले यांच्या रूपाने शेतकरी वर्गातून निर्माण झाल्याचे दिसून येते.'

तत्कालीन समाजव्यवस्थेचे स्वरूप पाहिल्यास असे दिसून येते की, अंधश्रद्धा, अज्ञान, अस्पृश्यता, शिक्षणाची दुरावस्था, अस्पृश्यता, कर्मकांड, शेतकरी व कष्टकरी वर्गाची दयनीय स्थिती या काळात दिसून येते. या सर्व सामाजिक प्रश्नांच्या अनुषंगाने महात्मा फुले यांनी अत्यंत परखडपणे आपले विचार मांडले. त्यांनी लिहिलेल्या गुलामगिरी, अस्पृश्यांची कैफियत, शेतकऱ्याचा असूड, सार्वजनिक सत्यधर्म, निर्मिकाचा शोध, ब्राह्मणांचे कसब, तृतीय रत्न हे नाटक या सर्व ग्रंथांमधून तत्कालीन समाजव्यवस्थेची अत्यंत चिकित्सक मीमांसा महात्मा फुले यांनी केलेली दिसते.



Scanned with CamScanner

महात्मा फुले यांच्या ग्रंथनिर्मितीकडे व त्यांनी केलेल्या कार्याकडे पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येते की, त्यांचे विचार मानवी जीवनाच्या विविध पैलूंशी निगडित आहेत. तसेच समाजातील उपेक्षित, शोषित वर्गाबरोबरच समाजाच्या सर्वांगीण विकासाशीही निगडित आहेत. शेतकऱ्यांचा असूडसारख्या पुस्तकांतून त्यांनी शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या प्रश्नांचा सखोलपणे विचार केलेला आहे. यावरून त्यांच्या कृषीविषयक विचारांची कल्पना येते.

संशोधन लेखाचा उद्देश :

प्रस्तुत संशोधन लेखाचा प्रमुख उद्देश महात्मा फुले यांचे कृषीक्षेत्राशी संबंधित विचार जाणून घेण्याचा आहे.

तथ्य संकलन :

प्रस्तुत संशोधनलेख लिहिण्यासाठी तथ्य संकलनाच्या दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी भारतीय समाजविज्ञान कोश, महात्मा फुले यांचे समग्र साहित्य व विषयाशी संबंधित इतर ग्रंथांचा अवलंब करण्यात आला आहे.

आशय विश्लेषण :

आपल्या देशामध्ये ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण 2011 च्या जनगणनेनुसार जवळपास 69 टक्के आहे व त्यातील बहुतांश लोक आजही कृषीक्षेत्राशी संबंधित आहेत. म्हणूनच देशाच्या विकासाचा विचार जेव्हा मांडला जातो, तेव्हा ग्रामीण विकास व कृषी विकासाला प्राथमिक स्थान देण्यात येते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या 75 वर्षांनंतर जेव्हा आपण कृषी क्षेत्राकडे पाहतो, तेव्हा आजही शेतकरी व शेतमजूर यांचे प्रश्न गंभीर स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व त्यांच्या हालअपेष्टा त्यांच्या दयनीय अवस्थेचे दर्शन घडवतात. यावरून स्वातंत्र्यपूर्व काळात शेतकऱ्यांचे प्रश्न किती विदारक असतील, याची आपल्याला कल्पना येते. या विदारक परिस्थितीची आणि शेतकऱ्याच्या प्रश्नांची मीमांसा महात्मा फुल्यांनी त्यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथातून केलेली आहे. महात्मा फुले हे आपल्या लेखणीतून तत्कालीन परिस्थितीचे चित्रण करत होते आणि आपल्या कार्यातून ती सुधारण्याचाही प्रयत्न करत होते. "शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेची कल्पना ब्रिटिश सरकारला यावी यासाठी ड्युक ऑफ कॅनॉट यांच्या सत्कार समारंभात शेतकऱ्याच्या दरिद्री वेशात जाऊन जोतीरावांनी शेतकरी व निकृष्ट वर्गाची विद्याविहिनता व दारिद्र्य याची कल्पना दिली."[२]

शिक्षणाचे व प्रागतिक विचारांचे महत्त्व श्रमजीवी लोकांना पटावे यासाठी केवळ वैचारिक क्रांतीचे आंदोलन, वैचारिक लेखन व प्रत्यक्ष प्रबोधन **करून उपयोग नाही, तर त्यासाठी**



Scanned with CamScanner

नाटकासारख्या रंजनप्रधान दृक-श्राव्य कलेतून आपला संदेश लोकांपर्यंत पोहोचवणे अधिक सुलभ ठरेल, हे म. फुले जाणून होते. त्यामुळेच "1885 मध्ये ज्योतिराव फुल्यांनी तृतीय रत्न या नावाचे पुरोहित वर्गाचे वर्चस्व स्पष्ट करणारे नाटक लिहिले. ज्योतिराव शेतकरी वर्गातील प्रौढ पुरुष व स्त्रिया यांच्यासाठी रात्रशाळा चालवित. या शाळेत श्रमजीवी वर्गातील लोकांनी यावे असे आवाहन नाटकाच्या शेवटी आहे."[३]

म. फुल्यांच्या काळातील समाजात सावकाराकडून शेतकऱ्यांना कसे फसवले जात होते व सावकारी पाशातून शेतकरी वर्गाची कशी दैना होत असे, याविषयी ज्योतिरावांनी केलेले वर्णन महत्त्वाचे आहे. ते पुढीलप्रमाणे : "त्यावेळेस सरकारात फिर्याद वगैरे करावी लागत नसे. कारण त्यांचे सावकारांचे घरात सरकार होते. मनास वाटेल त्याप्रमाणे मुलास मारावे, जोडावे, त्याचा सर्व माल हिसकावून घेऊन जावा, त्याची बैल ढोरे विकावी, त्याच्या मुला माणसांचे हाल करावे, त्याचे डोक्यावर अथवा पाठीवर मोठे थोरले धोंडे देऊन तरुणांमध्ये उभे करावे, शरीराचे नाजूक भागात काप लावावेत, कोलदांडा घालून मार द्यावा, सात-आठ रुपयाच्या रकमेकरिता शेत जाई, गुरेढोरे जाई, विहीर व मळे जाई आणि सरते शेवटी तोही देशोधडीस जाण्यास अथवा प्राणत्याग करण्यास सिद्ध होई."[४]

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचे जन्मापासूनच शोषण कसे होते, याची तपशीलवार माहिती शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथातून दिलेली आहे. धार्मिक विधी, संस्कार, सण, तीर्थयात्रा, ग्रहण यांसारख्या धार्मिक कर्मकांडाच्या क्षेत्रातून होणारे शोषण म. फुल्यांनी मांडले. त्याचबरोबर सरकारी खात्यामधून शिकलेला प्रतिष्ठित वर्गही सरकारी काम करण्यासाठी शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा व भोळेपणाचा गैरफायदा घेत असे. त्याचबरोबर सावकारांकडून शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा मोठ्या प्रमाणात घेण्यात येत असे. त्यामुळे शेतकरी वर्ग सातत्याने शोषला जात असे. याचे चिकित्सकपणे वर्णन म. फुल्यांनी केले आहे. त्यांनी आपल्या लेखनामध्ये केवळ तत्कालीन परिस्थितीचे वर्णन केले नाही, तर शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी, त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी काही आवश्यक असे उपायही सुचवले आहेत.

शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारावी व त्यांचे कल्याण व्हावे यासाठी महात्मा फुले यांनी नैतिकतेवर भर दिलेला दिसून येतो. शेतकऱ्यांचे आचरण हे नैतिक असले पाहिजे, यावर ते भर देतात. शेतकऱ्यांनी अनेक विवाह करू नयेत, त्याचबरोबर आपले आचरण शुद्ध ठेवावे, सरकारनेही शेतकऱ्यांच्या नैतिकतेवर लक्ष ठेवण्यासाठी डॉक्टरांच्या नेमणुका कराव्यात, बालविवाह करू नयेत **हे महत्त्वाचे विचार त्यांनी मांडले आहेत.** लग्नाच्या वयोमर्यादेबाबतही



Scanned with CamScanner

वैज्ञानिक दृष्टिकोण अंगीकारला पाहिजे, असे महात्मा फुले म्हणतात. त्याचबरोबर बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी वेगवेगळ्या योजना आखाव्यात, बहुजन समाजातून शिक्षक निर्माण करून त्यांना शिक्षण द्यावे, सरकारातील जागांवर बहुजन समाजातील माणसे घ्यावीत, ब्राह्मणांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात नोकऱ्या द्याव्यात, पाटीलकीसाठी परीक्षा ठेवाव्यात, व्यापाऱ्याच्या कुजक्या मालावर नजर ठेवावी, यासारख्या महत्त्वाच्या सूचना महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या अभ्युदयासाठी केलेल्या आहेत.[५]

महात्मा फुले यांनी 1885 साली लिहिलेल्या इशारा या पुस्तिकेतही इंग्रज राजवटीत ज्या लोकोपयोगी सुधारणा झाल्या, त्याचा उल्लेख केला आहे. जसे रस्तेनिर्मिती, दवाखाने, शाळा, धर्मशाळा यांची निर्मिती करून चांगले कार्य केले आहे, अशी नोंद ते घेतात. परंतु विशेष स्तुत्य व भूषणास्पद कार्य म्हणून त्यांनी जे जलसाठे केले, त्याचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. ते लिहितात, "त्या सर्वांमध्ये हल्ली हे काही प्रजेकरिता सरकारने हातात घेतले आहे, ते फारच उत्तम असून मोठे स्तुत्य व सरकारास चिरकाल भूषणास्पद आहे. त्या कृत्याचे महत्त्व फार काय विशेष सांगावे. परंतु ते कृत्य सरकारने आरंभ केल्यामुळे आज फार दिवसापासून दारिद्र्याने गांजलेल्या प्रजेला उर्जितकाळच प्राप्त झाला आहे. ते कोणते म्हणाल, तर जागोजाग डोंगराच्या आसपास खिंडी बुजवून मोठे विस्तीर्ण पाण्याचे तलाव केले आहेत. त्या स्थळापासून अनेक सुंदर कणाल काढून सरकार जागोजागी त्याचे पाणी सर्व आसपासचे गोरगरीब शेतकरी लोकांस अक्षय शेतीचे काम चालावे व ज्या ठिकाणी मनुष्यास पाणी पिण्यास देखील मिळण्याची पंचायत ते दूर व्हावी अशा कृत्याची फार दिवसापासून गरज होती. ती ईश्वरकृपेने लवकरच घडून आली." अशा पध्दतीने तत्कालीन सरकारने केलेल्या चांगल्या कार्याची नोंद घेऊन सरकारने लोककल्याणकारी कार्य करणे किती गरजेचे आहे, याचे विवेचन महात्मा फुले यांनी केलेले दिसून येते.

ग्रामीण भागातील लोकांच्या विकासासाठी जोतिरावांच्या काही कल्पना होत्या. ग्रामीण भागातील अभ्यासक्रमात मोडी आणि बाळबोध वाचन, हिशेब, इतिहास, भूगोल आणि व्याकरण यांचे सर्वसाधारण ज्ञान असावे, शेतकीचे प्राथमिक ज्ञान असावे, नैतिक व आरोग्यविषयक काही पाठ त्यांच्याकरता तयार केलेले असावेत, असे त्यांचे मत होते. शहरातील अभ्यासक्रमापेक्षा ग्रामीण भागातील अभ्यासक्रम हा सोपा आणि सुटसुटीत असावा. परंतु त्याच्या दैनंदिन व्यवहाराला सोडून असता कामा नये. शेतकीविषयक शास्त्रशुद्ध ज्ञान येण्यासाठी 'एक आदर्श



Scanned with CamScanner

शेतीची' योजना हवी. यामुळे विशेष फायदा होईल आणि जर ते आदर्श शेती व्यवस्थितपणे चालविले तर देशाचे अतिशय कल्याण होईल.[६]

शेती सुधारण्यासाठी महात्मा फुले यांनी आणखी अनेक महत्त्वाचे उपाय सुचवले आहेत. जसे शेतीसंबंधी अत्याधुनिक ज्ञान शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे, यासंबंधीची ग्रंथ शेतकऱ्यांना मिळाले पाहिजेत, शेती करण्यासाठी उत्तम बैल त्यांना मिळाले पाहिजेत, जनावरांसाठी जंगले मोकळी राहिली पाहिजेत, वाहणाऱ्या पाण्याला अडवून बंधारे घातले पाहिजेत, या कामासाठी सरकारने त्यांच्याकडे असलेल्या सुमारे दोन लाख पोलीस व सैन्यांच्या बळाचा वापर करावा, ठिकठिकाणी असणाऱ्या पाण्याचा शोध घेतला पाहिजे, तसेच पिकांचे संरक्षण होण्यासाठी पिकावर पहारे बसविले पाहिजेत, **हे त्यांनी** सुचवलेले महत्त्वाचे उपाय आहेत. हे उपाय आजही महत्त्वपूर्ण ठरतात. शेतीसाठी पाण्याबरोबर सरकारच्या आर्थिक मदतीची आवश्यकता असते व ती आर्थिक तरतूद करण्यासाठी सरकारने पगारदार वर्गाचे पगार आणि पेन्शन कमी करावेत आणि तो पैसा शेतीसाठी वापरावा, अशाही उपाययोजना महात्मा फुले सुचवतात.[७]

सारांश :

महात्मा फुले यांनी इशारा या आपल्या पुस्तिकेची सुरुवात

'जीस तन लागे वही तन जाने ।

बिजा क्या जाने गव्हारा रे ।'

या दोह्याने केली आहे. यावरून महात्मा फुले यांनी शेतकरी कुटुंबात जन्म घेतल्यानंतर ज्या व्यथा अनुभवल्या, शेतकऱ्यांचे दुःख जवळून पाहिले आणि जाणले त्यातूनच त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. हे विचार तत्कालीन समाजव्यवस्थेचा विचार करता अत्यंत क्रांतिकारी स्वरूपाचे होते. यापूर्वी कोणीही शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल एवढ्या पोटतिडकीने, परखडपणे आणि तार्किक आधारावरील असे विचार मांडले नव्हते. महात्मा फुले यांनी आपल्या विचाराने आणि कार्याने तत्कालीन समाजव्यवस्थेला जागृत करण्याचे कार्य केले. याविषयीचे महत्त्व विशद करताना डॉ ज. रा. शिंदे यांनी मांडलेले विचार अत्यंत महत्त्वपूर्ण वाटतात. ते म्हणतात, "जागृती ही क्रांतीची पहिली पायरी असते. नव्हे शोषित, पीडित जनतेची जागृती ही क्रांतीची पूर्वअट असते. समाजास वारंवार मिळणारे धक्के ही जागृती घडवून आणीत आहे. गुलामीचे आणि म्हणूनच शोषणाचे अनेक पदर असतात. या सर्व पदरांना जाणून त्या सर्वांवर एकत्रितरीत्या प्रहार केल्यावाचून ती गुलामी नष्ट होणार नाही. आज शोषणाच्या काही



Scanned with CamScanner

पदरासंबंधीची जागृती होताना दिसते. परंतु उद्याही शोषणाचे सर्व पदर त्यांना ओळखता येणारच नाहीत असे म्हणता येणार नाही. त्यांच्या जागृत होणाऱ्या महत्त्वाकांक्षातून त्यांना हळूहळू का होईना समग्र दृष्टी मिळणार आहे. त्यावेळी गुलामीच्या बेड्या तोडून सर्व समाज मुक्त झाल्यावाचून राहणार नाही. फुले यांना अभिप्रेत असलेली समसमान मानवी प्रतिष्ठा त्यावेळेस समाजजीवनात नक्कीच अवतरेल." महात्मा फुले यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांचे कल्याण साधण्यासाठी जे प्रयत्न केले, ते प्रयत्न आजही मार्गदर्शक व प्रेरणादायी आहेत, असे दिसून येते.

संदर्भ आणि टिपा :

1. (स. मा. गर्गे, 'भारतीय समाजविज्ञान कोश', पृष्ठ 321)
2. **तत्रैव**, पृष्ठ 324)
3. **तत्रैव**, पृष्ठ 323)
4. (महात्मा फुले प्रेरणा व तत्वज्ञान, पृष्ठ 36 ते 37)
5. (महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, धनंजय कीर (संपादक), पृष्ठ 381 ते 382)
6. (महात्मा फुले प्रेरणा व तत्त्वज्ञान, पृष्ठ 72)
7. (महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, धनंजय कीर (संपादक), पृष्ठ 383)

**संदर्भग्रंथ :**

1) महात्मा फुलेंच्या दुर्मिळ पुस्तिका, निर्मिकाचा शोध, मनुस्मृतीचा धिक्कार, ब्राह्मनांचे कसब, इशारा, अस्पृश्यांची कैफियत, नाग, नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, 2011
2) स. मा. गर्गे (संपादक), भारतीय समाजविज्ञान कोश, खंड 3
3) धनंजय कीर (संपादक), महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, 2006
4) गं. बा. सरदार, तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, धनंजय कीर, ज. रा. शिंदे, महात्मा फुले : प्रेरणा व तत्त्वज्ञान, महात्मा जोतिबा फुले प्रतिष्ठान प्रकाशन, औरंगाबाद, 1990
5) जोतीराव गोविंदराव फुले, शेतकऱ्यांचा असूड, 1883



Scanned with CamScanner